डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

दिनांक: ०५/०२/२०१९

# शुद्धीपत्रक/ Corrigendum

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या युवक- युवतींसाठी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण (शारीरिक व लेखी परीक्षेकरिता ४ महिने कालावधीचे) देण्यात येणार असून नागपूर, परभणी, औरंगाबाद, नाशिक, धुळे, जळगाव आणि सिंधुदुर्ग हे सात जिल्हे वगळून उर्वरित सर्व जिल्हा स्तरावर सदर कार्यक्रम राबविण्याकरिता खाजगी संस्थांची जिल्हास्तरीय निवड करण्याकरिता ई- निविदा क्रमांक २६१ ची जाहिरात दिनांक २५/०१/२०१९ रोजी दैनिक वृत्तपत्रात तसेच महाराष्ट्र शासनाच्या वेब साईट वर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. निविदेमध्ये नमुद केल्या प्रमाणे कोचिंग संस्थाची निवड (**Institute Empanelment**) करण्याकरीता इच्छुक निविदाधारकांच्या शंकांचे निरसन करण्याकरिता दिनांक ०४/०२/२०१९ रोजी सकाळी ११:३० वाजता निविदा पुर्व बैठक मा. महासंचालक, बार्टी, पुणे यांच्या अध्यक्षते खाली बार्टी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. बैठकीसाठी उपस्थित असलेल्या प्रशिक्षण संस्थांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात आले:

१) स्वारस्य देकार/प्रस्ताव भरणाऱ्या संस्थाद्वारे प्रशिक्षित होऊन पोलीस व इतर शासकीय सेवांमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी ऐवजी नियुक्ती पत्र जोडावे.

२) पोलीस प्रशिक्षण ग्राऊंड किमान ४०० चौरस मीटरचे असावे, ज्यात धावपट्टी, पूल अप्स करिता सिंगलबार, गोळा फेक करिता पीच, लांब उडी करिता सॅन्ड पीच, इ. सुविधा [illegible] पोलीस विभागाच्या पोलीस भरती नियमानुसार असाव्यात.

३) संस्थेच्या नावाने जे खाते आहे त्या संस्थेचे हैसियत प्रमाणपत्र (Bank Solvency certificate) निविदा प्रसिद्ध झालेल्या दिनांकानंतरचे असावे.

**४) महाराष्ट्रातील नक्षलग्रस्त व दुर्गम भागातील काम करणाऱ्या प्रशिक्षण संस्थांचे निवडीबाबत अटी- शर्ती शिथिल करण्याचे अधिकार मा. महासंचालक, बार्टी, पुणे यांना राहतील.**

**कैलास कणसे (भापोसे)**
**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**